मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » मंगळवार, दि.12 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# गल्लोगल्ली घुमतोय 'आऽव्वाऽऽऽऽज कुणाचाऽऽ'

## चिंचवड, पिंपरी, भोसरी मतदारसंघांत प्रचार : अवघे सात दिवस शिल्लक, पदयात्रा, बैठकी आणि सभांवर जोर

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी (ता. २०) मतदान होणार आहे. त्याचा प्रचार सोमवारी (ता. १८) सायंकाळी संपणार आहे. प्रचारासाठी अवघे सात दिवस शिल्लक असून सर्वच उमेदवारांनी मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीगाठींवर भर दिला आहे. पदयात्रा, कोपरा सभा, बैठकी सुरू आहेत. काही उमेदवारांसाठी स्टार प्रचारकांच्या सभा व रॅली झाल्या आहेत. आणखी काही सभांचे आयोजन केले आहे. रिक्षा, जीप अशा वाहनांवरील ध्वनिक्षेपांद्वारे प्रचाराचे सूरही कानी पडत आहेत. 'आला रे आला... आला', 'येऊन येऊन येणार कोण?.... यांच्याशिवाय आहेच कोण?', 'आऽव्वाऽऽऽज कोणाचा? ...' अशा घोषणा गल्लीबोळात ऐकू येत आहेत.

पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत चिंचवड, पिंपरी आणि भोसरी मतदारसंघ आहेत. तीनही मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असेच वातावरण आहे. शहरातील ताथवडे गावाचा समावेश भोर-वेल्हे-मुळशी मतदारसंघात होतो. तिथेही असेच वातावरण आहे. लगतच्या मावळ मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराविरुद्ध अपक्ष अशी लढत होत आहे. सर्व प्रमुख पक्षांच्या उमेदवारांसह अन्य राज्यस्तरीय पक्ष व अपक्षांनीही मतदारांच्या भेटीगाठींवर भर दिला आहे. त्यामुळे शहरातील वातावरण निवडणूकमय झाले आहे. पदयात्रा, वाहनफेरी, कोपरा सभा, बैठकी, जाहीरसभा होत आहेत

असे असताना आता मुंबई आयआयटीच्या तज्ज्ञांचा आधार घेण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. तब्बल १३ वर्षांपासून महापालिकेचा पवना बंद जलवाहिनी प्रकल्प बंद स्थितीत पडून आहे. राज्य शासनाने त्या कामावरील स्थगिती ८ सप्टेंबर २०२३ ला उठविली आहे.



### प्रशासनाची तयारी

» चिंचवड, पिंपरी, भोसरी विधानसभा मतदारसंघांत मतदान प्रक्रियेसाठी मतदान यंत्रे जुळणी करण्याच्या (पेअरिंग) प्रक्रियेला सुरवात झाली आहे. स्ट्राँग रुमचे सील हे उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत पोलिस बंदोबस्तात उघडण्यात आले. तेथील सुरक्षेचा आढावाही घेण्यात आला. मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर निवडणूक विभागाने कामकाज सुरू केले आहे. मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू आहे. उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी पूर्ण झाली आहे. आणखी दोन टप्प्यात तपासणी होणार आहे.

### आजपर्यंतच्या सभा, रॅली

» चिंचवड, पिंपरी, भोसरी मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आतापर्यंत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे यांच्या सभा झाल्या आहेत. खासदार मनोज तिवारी यांनी भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार यांच्या सभा झाल्या आहेत. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी श्रीवर्धन यांची पदयात्रा, डॉ. कोल्हे व रोहित पवार यांची बाईक रॅली झाली आहे.

### आगामी सभा, बैठकी

» महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची सभा बुधवारी (ता. १३) भोसरी विधानसभा मतदारसंघात होत आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत जाधव यांची जाहीर सभा आकुर्डी गावठाणात मंगळवारी (ता. १२) होणार आहे.औद्योगिक सुट्टीचा दिवस गुरुवार (ता. १४) आणि सार्वजनिक सुट्टीचे शनिवार (ता. १६) आणि रविवार (ता. १७) असे तीन दिवस निवडणूक प्रचाराच्या धामधुमीचे ठरणार आहेत.

# अण्णा बनसोडे यांच्या आकुर्डीतील पदयात्रेस जेष्ठ नागरिकांसह युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद...

## अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ भव्य पदयात्रा काढण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस भारतीय जनता पार्टी शिवसेना आरपीआय आठवले गट व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ रविवारी आकुर्डी गावठाण व परिसरामध्ये भव्य पदयात्रा काढण्यात आली.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष व महायुतीचे समन्वयक योगेश बहल, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला शहराध्यक्ष व माजी नगरसेविका वैशाली काळभोर, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, आरपीआयचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब भागवत, भाजपा शहर सरचिटणीस व माजी नगरसेवक राजू दुर्गे, माजी उपमहापौर व नगरसेवक राजू मिसाळ, माजी नगरसेवक उल्हास शेट्टी, ईश्वर ठोंबरे, निलेश पांढरकर, प्रमोद कुटे, कैलास कुटे, सविता वायकर व तेजस्विनी दुर्गे, मनीष काळभोर, सतीश काळभोर, कामगार नेते रवी घोडेकर, आबा गायकवाड, रेखा कडाली, मनीषा शिंदे, नाना पिसाळ, खेमराज काळे, अजय शितोळे, सतीश लांडगे, आकुर्डी जेष्ठ नागरिक संघाचे आबा गायकवाड, महेश काटे, मंगेश कुटे, सचिन काळभोर, सचिन बंदी, संतोष तरटे, वसंत काळभोर, मनीषा शिंदे, चैतन्य काळभोर आदींचं आकुर्डी व परिसरातील ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रमुख पदाधिकारी युवक युती व महिला भगिनी मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी झाले होते.

आकुर्डीतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पदयात्रेस सुरुवात करण्यात आली. विठ्ठल मंदिर येथे पदयात्रेचा समारोप झाला. ठिकठिकाणी महिलांनी औक्षण केले व युवक युवतीने पुष्पवृष्टी करून आमदार अण्ण बनसोडे यांना शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या आमदार बनसोडे यांनी समजून घेतल्या.

# चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सांगवीत राहुल कलाटे यांना जगतापांचे बळ

## राहुल कलाटे यांच्या प्रचारार्थ वाल्हेकरवाडीत रोहित पवार यांची सभा झाली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्रचारार्थ वाल्हेकरवाडीत आमदार रोहित पवार यांची सभा झाली. त्यावेळी महापालिका स्थायी समितीचे माजी अध्यक्ष नवनाथ जगताप आणि मराठवाडा विकास महासंघाचे अध्यक्ष अरुण पवार यांनी कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.



नवनाथ जगताप हे सांगवीचे भूमिपुत्र असून, त्यांची परिसरातील सामाजिक, राजकीय क्षेत्रात मजबूत पकड आहे. उत्तम संघटन कौशल्य, तळागाळातील कार्यकर्त्यांबरोबर असलेला थेट संवाद यामुळे त्यांना मानणारा मोठा वर्ग पिंपळे गुरव, नवी आणि जुनी सांगवी परिसरात आहे. आता, त्यांची कलाटे यांना खंबीर साथ लाभल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहेत.

त्यांच्यासह अरुण पवार, माजी स्वीकृत सदस्य शिवाजी पाडुळे, निखिल चव्हाण, पंकज कांबळे यांनीही राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. यामुळे प्रस्थापितांच्याबालेकिल्ल्याला मोठे भगदाड पडल्याची जोरदार चर्चा मंतदारसंघात रंगली आहे.

### शरद पवार यांची सभा होणार

» पिंपरी, चिंचवड, भोसरी मतदारसंघांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार उभे आहेत. त्यांना महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासह सर्व घटक पक्षांचे सहकार्य मिळत आहे. तीनही मतदारसंघातील उमेदवारांच्या प्रचारासाठी शरद पवार यांची सभा होणार आहे.

# देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या विश्वासाने आलेल्या नागरिकांचा भ्रमनिरास : खासदार सुप्रिया सुळे

## राहुल कलाटेंच्या प्रचारार्थ संवाद बैठक : सत्ता येताच आयटीयन्सच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य देणार

**पुणे | प्रतिनिधी**

गेली दहा वर्ष गल्ली ते दिल्ली भाजपची सत्ता होती. तरीही, चिंचवड मतदारसंघात नागरी समस्या कायम आहेत. मूलभूत गरजांची पूर्तता आणि आवश्यक सोयी सुविधांसाठी आजही येथील नागरिक संघर्ष करत आहेत. प्रचंड ट्रॅफिक, वायू प्रदूषण, अपुरे पाणी, विजेचा लपंडाव असे अनेक प्रलंबित प्रश्न कायम आहेत. आता, विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा तेच-तेच आश्वासने देऊन त्यांचेच उमेदवार मतांचा जोगवा मागण्यासाठी फिरत आहेत. मात्र, गेली दहा वर्ष चिंचवड मतदार संघात नक्की तुम्ही केलं काय? असा प्रश्न पडतो. राज्यात महाविकास आघाडीची सात येताच करदात्यांना मूलभूत सुविधा देण्याला प्राधान्य असेल असे आश्वासन खासदार सुप्रिया सुळे यांनी वाकड येथे दिले.

महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्रचारार्थ आयटीयन्स आणि स्थानिक नागरिकांशी छोटेखाणी बैठकीत संवाद साधताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी महत्वाची खासदार सुप्रिया सुळे व मान्यवरांच्या हस्ते राहुल कलाटे यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशनही करण्यात आले. यावेळी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर, महिला प्रदेश प्रदेशाध्यक्षा स्वाती चिटणीस, महिला प्रदेश संघटक मंजिरी धाडगे, आमदार सुमन पाटील, राष्ट्रवादीचे विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुनिल गव्हाणे, शहराध्यक्ष तुषार कामठे, युवकाध्यक्ष इम्रान शेख, नवनाथ जगताप, कार्याध्यक्ष सागर तापकीर, ज्योती निंबाळकर यांच्यासह मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

सुळे पुढे म्हणाल्या, एक हाती सत्ता असताना नागरिकांना केवळ आश्वासनं दिली, समस्यांचे निराकरण करण्यासाठी ठोस निर्णय घेतले नाही त्यामुळे मतदार संघात वीज, पाणी, सुरक्षित रस्ते, वाहतूक कोंडी, कचरा यासारख्या समस्या कायम आहेत. यापलीकडे जाऊन प्रशस्त उद्याने, मनोरंजन केंद्र, पर्यावरण यासाठी सुद्धा ठोस कामे झाली नसल्याच्या भावना नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, मागच्या तीन निवडणुकात दिलेली किती आश्वासने पूर्ण केली हा संशोधनाचा विषय आहे. प्रामुख्याने, ब्लु लाईनमधील घरांचा प्रश्न का सुटला नाही? सोसायट्यांमध्ये टँकर राज का? सुरु झाले आहे. पुनावळे, रावेत, वाकडमधले महामार्गा लगत असलेल्या सर्व्हिस रोडचे रुंदीकरण का? रखडले आहे. ठीक ठिकाणी सेवा रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरावस्था का? झाली आहे. कचऱ्याचा प्रश्न प्रलंबित आहे. याची परिनीती म्हणून मतदार संघात सगळीकडे सत्ताधाऱ्यां विरोधात प्रचंड नाराजी आणी अविश्वास दिसत आहे. त्यामुळे, यंदा चिंचवड मतदार संघात बदल हा निश्चित आहे अशा चर्चा गावठाण, वाड्या वस्त्या ते उच्चभ्रू सोसायटी धारकांमध्ये ऐकायला मिळत आहे.



### आयटीयन्सने मांडले समस्यांचे गाऱ्हाणे..

» यावेळी चिंचवड विधानसभेतील नागरिकांनी सुळेंशी संवाद साधण्यासाठी गर्दी केली होती. हिंजवडीतील ९ तासांच्या नोकरीसाठी तब्बल पाच तासांहुन अधिक वेळ ट्रॅफिकमध्ये जातो, वर्दळ असलेल्या वाकड, पिंपळे सौदागरला मेट्रो कनेक्टिव्हीटी का नाही? हिंजडीतील मेट्रो बालेवाडीकडे न वळता त्याची हिंजवडी, वाकड, पिंपळे सौदागर, नाशिक फाटा असा रूट का नाही? आटीयन्स नाईलाजाने कारने प्रवास करतात मात्र ट्राफिकमुळे इंधनाच्या अपव्ययाबरोबर वेळ पैसा यामुळे नैसर्गिक संसाधनांचा गुन्हेगारी अपव्यय व प्रदूषणात भर पडते. २४x ७ पाणी पुरवठा कुठे आहे. मालमत्ता हस्तांतरणाचे टॅक्सेस कमी करावे, आयटीतील खड्डयांची मालिका, विज लपंडावाची डोकेदुखी, जनरेटरवर डिझेलसाठी वर्षाकाठी लाखो रूपयांचा खर्च, टँकरद्वारे तहान भागविण्यासाठी वर्षाकाठी २० लाख ते १ कोटींचा खर्च आदी समस्यांचे गाऱ्हाणे त्यांनी मांडले.

# देहूगावात विकासाच्या जोरावर सुनील शेळके यांच्या प्रचारासाठी रेकॉर्ड ब्रेक गर्दी

## आमदार शेळके यांच्या प्रचारासाठी हजारो देहूकर उतरले रस्त्यावर

**पुणे | प्रतिनिधी**

देहूगाव येथे केलेल्या विविध विकास कामांमुळे राष्ट्रवादी काँग्रेस-भाजप- शिवसेना- आरपीआय-एसआरपी महायुतीचे उमेदवार आमदार शेळके यांना 'रेकॉर्ड ब्रेक' प्रतिसाद मिळाला. आमदार शेळके यांच्या प्रचारासाठी हजारो देहूकर रस्त्यावर उतरल्याचे चित्र रविवारी पाहायला मिळाले.

आमदार शेळके यांनी रविवारी दुपारी देहूगाव चा प्रचार दौरा करीत मतदारांशी संवाद साधला. यावेळी सजवलेल्या बैलगाडीतून शेळके यांची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर गावातील विविध भागात त्यांनी केलेल्या 'रोड शो'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

त्यावेळी देहूच्या नगराध्यक्ष पूजा दिवटे, माजी नगराध्यक्ष स्मिता चव्हाण, उपनगराध्यक्ष मयूर शिवशरण, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष विवेक काळोखे, बांधकाम समिती सभापती योगेश काळोखे, पाणीपुरवठा समितीचे सभापती सुधीर काळोखे तसेच नगरसेवक, महायुतीतील घटक पक्षांचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व देहूकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देहूकर नागरिकांनी आतापर्यंत भरभरून प्रेम दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून आमदार शेळके म्हणाले की, सत्ता आणि पद येते-जाते पण जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्याचा आणि टिकवण्याचा प्रयत्न मी सातत्याने केला व यापुढेही करत राहीन. माझ्यावर देहूकारांनी दाखवलेल्या विश्वासाला मी आयुष्यात कधीही तडा जाऊ देणार नाही.

देहूगावचा सर्वांगीण विकास हेच आपले ही असून नगरपंचायतीबरोबरच शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी आपण उपलब्ध करून दिला. देहूगावात झालेला बदल, झालेला विकास याची आपण साक्षीदार आहात. त्या विकासाची पावती, माझ्या प्रामाणिक कामाची पावती या निवडणुकीत मला भरघोस मते द्याल, असा विश्वास वाटतो,अशी शेळके म्हणाले.

'आमचे मत विकासाला, महायुतीच्या सुनील अण्णांना', 'सुनील आण्णा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है', 'महायुतीचा विजय असो', अशा घोषणा देत उपस्थित जनसमुदायाने आमदार शेळके यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या.



# "ऑल इंडिया फ्रेंड्स सर्कल"चा भाऊसाहेब भोईर यांना जाहीर पाठिंबा

## भाऊसाहेब भोईर यांना मुस्लिम बांधवांकडून मोठे मताधिक्य मिळेल हे चित्र आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार भाऊसाहेब भोईर हे सर्वांगीण विकासासाठी योग्य उमेदवार असल्याने मुस्लिम ऑल इंडिया फ्रेंड्स सर्कल संघटनेने भाऊसाहेब भोईर यांना जाहीर पाठिंबा दिला असून संघटनेचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते चिंचवड येथे भाऊसाहेब भोईर यांची भेट घेवून त्यांनी भोईर यांच्याशी चर्चा करून ऑल इंडिया फ्रेंड्स सर्कल संघटना ही भाऊसाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून त्यांना जाहीर पाठिंबा असल्याचं जाहीर केले आहे. त्यामुळे चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाऊसाहेब भोईर यांना मुस्लिम बांधवांकडून मोठे मताधिक्य मिळेल हे चित्र आहे.

कपाट हे निवडणूक चिन्ह घेवून निवडणुकीच्या रिंगणात अपक्ष म्हणून भाऊसाहेब भोईर हे उतरले आहेत. भोईर यांच्या प्रचाराचा वेग वाढल्याने चिंचवड मतदारसंघातील विविध राजकीय पक्ष, संस्था आणि संघटनांचा पाठिंबा मिळाला आहे. तसेच विविध समाज बांधव स्वतः भोईर यांची भेट घेवून आपण सोबत असल्याचे सांगत आहेत. तर काही समाज बांधवांनी यंदा भाऊसाहेब भोईर यांना आमदार करण्याचा ध्यास घेवून भाऊसाहेबांना जोडले जात आहेत.

चिंचवडच्या विकासासाठी ए. पी. जी अब्दुल कलाम यांचे विचार घेऊन मुस्लिम युवक भाऊसाहेब भोईर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा ठाकला आहे. यावेळी ऑल इंडिया फ्रेंड्स सर्कल चिंचवड शहरचे अध्यक्ष यासीन भाई शेख, सोहेल भाई शेख, मुशरफ सय्यद, शाहरुख शेख, साजिद कुरेशी, सलमान शेख,अवेज खान, फैजाम शेख, रहीम शेख, शकील शेख व सर्व मित्र परिवार उपस्थित होते. भाऊसाहेब भोईर यांनी मुस्लिम बांधवांच्या अडी – अडचणी जाणून घेतल्या. व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचा शब्द भोईर यांनी ऑल इंडिया फ्रेंड्स सर्कल संघटनेला दिला आहे.



# सुट्टीचा उपयोग करा, मताधिकार बजावा!

## आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन : शहरात मतदार जनजागृती बाईक रॅली संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदानाच्या दिवशी शासकीय व खासगी आस्थापनांनी आपल्या कर्मचाऱ्यांना पगारी सुट्टी देण्याबाबत शासनाने कळविले आहे. शहरात इतर ठिकाणी कामे करणाऱ्या नागरिकांना देखील संबंधितांनी सुट्टी देऊन मतदान करण्याबाबत प्रेरित करावे, या सुट्टीचा उपयोग मतदारांनी मतदानासाठी करून आपला मताचा अधिकार बजावावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.




शहरात भव्य मतदार जनजागृती बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, निगडी येथील भक्ती शक्ती चौकात आयुक्त सिंह यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवत बाईक रॅलीस प्रारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, पालिकेचे कर्मचारी, पोलीस प्रशासनाचे अधिकारी, कर्मचारी, युथ आयकॉन उपक्रमातील स्पर्धक यांच्यासह विविध भागातून आलेले सुमारे ३५० पेक्षा अधिक बाईक रायडर्स आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक आयोगाने मतदानासाठी बुधवार,दि २० नोव्हेंबर २०२४ हा सलग सुट्टी नसलेला दिवस निवडला आहे. सुट्टीचा उपयोग इतर कामासाठी न करता मतदानासाठीच सुट्टीचा वापर व्हावा, हा त्यामागचा उद्देश असल्याचे आयुक्त म्हणाले.

दरम्यान, निगडी येथील भक्ती शक्ती चौकात जीएनडी ग्रुप च्या बाल कलाकारांनी मतदार जनजागृतीपर नृत्य सादरीकरण केले. या कलाकारांनी आपल्या मनमोहक, चित्तथरारक व प्रबोधनात्मक नृत्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. आयुक्त सिंह यांनी देखील यावेळी बालकलाकारांचे कौतुक केले.

बाईक रॅली लांडेवाडी भोसरी येथे आली असता महापालिकेच्या वतीने उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या रॅलीची सांगता भोसरी येथील कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे झाली.

### मतदार जनजागृती बाईक रॅली

» पिंपरी, भोसरी आणि चिंचवड या विधानसभा मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी या मतदार जनजागृती बाईक रॅलीने तिनही मतदार संघातील प्रमुख मार्गांवरुन सुमारे ३३ किलोमीटर अंतर पार केले. यावेळी रॅलीद्वारे देण्यात येणारा संदेश ऐकण्यासाठी तसेच रॅली पाहण्यासाठी विविध भागात नागरिकांनी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# दोन पक्ष फोडल्याचा कसला अभिमान बाळगता!

## खासदार सुप्रिया सुळे यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सवाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी भाजपने एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या ४० आमदारांना प्रत्येकी ५० कोटी रुपये दिले, असे दोन हजार कोटी रुपये खर्च करून सरकार पाडले. असे असताना दोन पक्ष फोडून आल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगत आहेत. दोन पक्ष फोडल्याचा कसला अभिमान बाळगता, असा सवाल राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. पुण्यातील वर्तुळाकार मार्गासाठी (रिंगरोड) वाढीव २० हजार कोटी रुपये कोणाच्या घशात गेले, हे जनतेला कळले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.



महाविकास आघाडीचे भोसरीचे उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ मोशीत आयोजित महिला मेळाव्यात खासदार सुळे बोलत होत्या. माजी आमदार विलास लांडे, प्रकाश म्हस्के, शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी महापौर मोहिनी लांडे, सुलभा उबाळे यावेळी उपस्थित होते.

पुणे जिल्ह्यातील वर्तुळाकार मार्गाला आमचा विरोध नाही. त्यातील भ्रष्टाचाराला विरोध आहे. वर्तुळाकार मार्गाच्या कामाचा मूळ खर्च १८ हजार कोटी रुपये होता. त्यामध्ये २० हजार कोटींची वाढ केली. त्यामुळे वर्तुळाकार मार्गाचा खर्च ३८ हजार कोटींवर गेला आहे. वाढीव २० हजार कोटी रुपये कोणाच्या घशात गेले, हे आम्हाला कळले पाहिजे. या कामातील भ्रष्टाचार बाहेर काढला जाईल. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर या कामाचा कंत्राटदार बदलण्यात येईल असे सांगून खासदार सुळे म्हणाल्या, की आमचा संघर्ष वैयक्तिक नाही. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि अदृश्य शक्तिविरोधात आमची लढाई आहे.

लोकसभा निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण सरकारला आठवली नाही, त्याचा मी अनुभव घेत आहे. लोकसभेला दणका बसल्यानंतर लाडकी बहीण आठवली. भाजप खासदार दुसऱ्या पक्षाच्या सभेला गेल्यास पैसे वसूल केले जातील, अशा धमक्या महिलांना देतो. हे काय यांच्या घरातले पैसे देत आहेत का, कारवाईपासून वाचण्यासाठीच अजित पवार आणि त्यांच्यासोबतचे आमदार भाजपबरोबर गेले आहेत. भाजपबरोबर गेल्यापासून त्यांना शांत झोप लागते. 'ईडी'ची धाड टाकायची आणि पक्षात घ्यायचे. हे भाजपचे राजकारण सुरू आहे. पळपुटे पळून गेले, मात्र, आम्ही मोडू पण दिल्लीच्या तख्तासमोर वाकणार नाही, झुकणार नसल्याचेही सुळे म्हणाल्या.

### पक्षाचे निर्णय अजित पवारच घेत होते...

» अजित पवारांना नेते केले नसल्यामुळे राष्ट्रवादीत फुट पडल्याच्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आरोपाबाबत बोलताना खासदार सुळे म्हणाल्या, अजित पवारांची ३० आणि माझी राजकारणातील १८ वर्षे पहावीत, दोघांना पक्षात काय मिळाले, याचा हिशोब करावा. मी लोकसभेच्या उमेदवारीशिवाय पक्षाकडे काही मागितले नाही. पक्षाचे निर्णय कोण घ्यायचे हे जनतेला माहिती आहे. त्यामुळे शहा यांच्या आरोपाला काही अर्थ नाही, असेही सुळे म्हणाल्या.

### धमक्यांचा काळ गेला - सुप्रिया सुळे

» भोसरीचे भाजपचे उमेदवार २० तारखेनंतर आपले खरे रूप दाखविण्याची धमकी देत आहेत. त्यांनी एका व्यक्तीला जरी धमकी द्यावी, भिती दाखवावी. महिला लाटणे घेऊन मागे लागतील. धमक्यांचा काळ आता गेला. ते जेवढ्या धमक्या देतील, तेवढी गव्हाणे यांची मते वाढतील, असेही सुळे म्हणाल्या.

# महापालिकेकडून अभ्यासिकांचे सर्वेक्षण पूर्ण

## अग्निशमन दलाकडूनही होणार फायर ऑडिट : विद्यार्थी सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यभरातून लाखो विद्यार्थी पुण्यात शिक्षणासाठी येतात. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी साडेसातशेहून अधिक अभ्यासिका उभारण्यात आल्या आहेत. नवी पेठेतील अभ्यासिकेला आग लागल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांची सुरक्षिततेचा मुद्दा समोर आला होता. त्यावर महापालिकने शहरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण केले असून त्याचा अहवाल महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना सादर करण्यात आला आहे. तसेच अग्नीशमन दलाकडूनही अभ्यासिकांचे फायर ऑडिट पूर्ण केले जाणार आहे.



शहरातील दाटीवाटीच्या इमारतींमध्ये, जून्या वाड्यात तसेच इमारतीच्या पार्किंगमध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करण्यात आल्या आहेत. लाखो विद्यार्थी या अभ्यासिकांमध्ये जीव धोक्यात घालून अभ्यास करत आहेत. मात्र, अभ्यासिका चालकांकडून सुरक्षिततेची कोणतीच काळजी घेतली जात नसल्याचे समोर आले आहे. नवी पेठेतील ध्रुवतारा अभ्यासिकेला ऑक्टोबर महिन्यात आग लागल्याची घटना घडली होती. या आगीत अभ्यासिका जळून खाक झाली. त्यात सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही. मात्र विद्यार्थ्यांनी कष्ट घेवून तयार केलल्या नोट्स आणि त्यांची पुस्तके जळाली. यामुळे विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागला.

### अहवालही महापालिका आयुक्तांकडे सादर

दरम्यान, या आगीच्या घटनेनंतर महापालिका आयुक्त भोसले यांनी शहरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण करण्याबाबतच्या सूचना प्रशासनाला दिल्या होत्या. त्यानुसार सर्वेक्षण करण्यात आले असून त्याचा अहवालही महापालिका आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे. तर अग्निशमन दलाकडूनही अभ्यासिकांच्या सुरू असलेल्या पाहणीचे (फायर ऑडिट) काम आठ दिवसांत पूर्ण होईल, असा दावा केला आहे. आयुक्त भोसले यांनी शहरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण करून, दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबतचा आदेश दिले आहेत.

यापूर्वी महापालिकेने पूर परिस्थितीचा अहवाल तयार केला आहे. तसेच इतर विषयांवर अभ्यास करुन अहवाल तयार करण्याच्या सूचना विविध विभागांना दिल्या आहेत. परंतु असे अहवाल तयार झाले पण त्यावर कोणती कार्यवाही झाली, हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे आता तरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या अहवालावर आयुक्त काय भूमिका घेणार

### शहरात 750 पेक्षाही अधिक अभ्यासिका

» नारायण पेठ, सदाशिव पेठ, नवी पेठ, शनिवार पेठ, बुधवार पेठ, शनिपार, कोथरुड, दांडेकर पूल परिसर, दत्तवाडी आदी अभ्यासिका मोठ्या प्रमाणात आहे. याच भागातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण महापालिकेने केले असल्याची माहिती प्रशासनाने दिली. या अभ्यासिकाध्ये महापालिकेच्या नियमांचे पालन केले जात आहे का?, अभ्यासिकांची रचना, विद्यार्थ्यांची संख्या, आगविरोधक यंत्रणा या स्वरूपाची माहिती सर्वेक्षणात घेण्यात आली. त्यातील अनेक अभ्यासिकांमध्ये आगविरोधी यंत्रणांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले. सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल व अभ्यासिकांना बजावण्यात येणाऱ्या नोटीसचे स्वरूप महापालिका आयुक्तांच्या कार्यालयाकडे पाठवण्यात आले असल्याची माहिती बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, शहरात अभ्यासिका ७५० पेक्षा जास्त असल्याचे सांगितले जात आहे. पुण्यात सुमारे अडीच ते तीन लाख विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची करतात. आगीच्या घटनेनंतर अग्नीशमन दलालाही अभ्यासिकांची पाहणीचे करण्याचे आदेश दिले आहेत. दिवाळीमध्ये हे काम थांबले होते, आता पुन्हा अभ्यासिकांची पाहणी सुरू करण्यात आली आहे. आठ दिवसांत हे काम पूर्ण करून, त्याबाबतचा अहवाल महापालिका आयुक्तांकडे सादर केला जाईल, असे अग्निशमन दलाने सांगितले.

# पुण्यात फळभाज्यांची आवक जैसे थे; बाजार स्थिर !

## लसूण महागला; कोथिंबिर आणि मेथी वगळता उर्वरित सर्व फळभाज्यांचे भाव स्थिर

**पुणे | प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डातील तरकारी विभागात राज्यासह परराज्यांतून होणारी फळभाज्यांची आवक गत आठवड्याच्या तुलनेत टिकून आहे. आवक-जावक कायम असल्याने लसूण वगळता सर्व फळभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहेत. बाजारातदाखल होत असलेल्या मालाच्या तुलनेत मागणी जास्त असल्यामुळे लसणाच्या भावात 10 ते 15 टक्क्यांनी वाढ झाली असल्याची माहिती ज्येष्ठ अडतदार विलास भुजबळ यांनी दिली.





गुलटेकडी मार्केट यार्डात रविवारी (दि. 10) राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून मिळून सुमारे 90 ते 100 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. परराज्यातून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात येथून हिरवी मिरची 8 ते 10 टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी 4 ते 5 टेम्पो, कर्नाटक येथून पावटा 2 टेम्पो, आंध्रप्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा 3 ते 4 टेम्पो, इंदौर येथून 6 ते 7 टेम्पो गाजर, कर्नाटक आणि गुजरात येथून घेवडा 2 ते 3 टेम्पो, गुजरात येथून 3 टेम्पो भुईमुग शेंग, मध्यप्रदेश येथून लसणाची सुमारे 8 ते 10 टेम्पो इतकी आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकमध्ये सातारी आले सुमारे 400 ते 500 गोणी, भेंडी 5 ते 6 टेम्पो, गवार 5 ते 6 टेम्पो, टोमॅटो दहा ते अकरा हजार पेटी, हिरवी मिरची 3 ते 4 टेम्पो, काकडी 7 ते 8 टेम्पो, फ्लॉवर 8 ते 10 टेम्पो, कोबी 3 ते 4 टेम्पो, सिमला मिरची 7 ते 8 टेम्पो, भुईमुग शेंग 40 ते 50 गोणी, पुरंदर, पारनेर, वाई आणि सातारा परिसरातून मटारची 40 ते 50 गोणी, तांबडा भोपळा 8 ते 10 टेम्पो, कांदा सुमारे 80 ट्रक, इंदौर, आग्रा, स्थानिक भागातून मिळून बटाट्याची 40 ते 45 ट्रक आवक झाली होती.

### कोथींबीर, मेथीच्या भावात घट

» मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे कोथिंबिर आणि मेथी वगळता सर्व पालेभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहेत. आवकच्या तुलनेत मागणी कमी असल्यामुळे कोथिंबिर आणि मेथीच्या भावात मात्र घाऊक बाजारात जुडीमागे 3 ते 4 रुपयांनी घट झाली आहे. मार्केट यार्ड येथील घाऊक बाजारात रविवारी (दि. 10) कोथिंबिरीची सुमारे सव्वा लाख जुडी तर मेथीची 35 हजार जुडींची आवक झाली होती. ही आवक मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहे. घाऊक बाजारात कोथिंबिर आणि मेथीच्या जुडीला अनुक्रमे 8 ते 18 रुपये आणि 15 ते 25 रुपये भाव मिळाल्याचे व्यापार्यांनी सांगितले.